स.फौ.प्र.क्र. ०१/२०१८
सरकार वि. पुस्तकला
निशानी क्र. ८ खाली

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, लाखनी, जिल्हा भंडारा, यांचे न्यायालयात</u>**
(सुनावणी पिठासीन अधिकारी प्रियंका आर. पमनानी यांचे समोर)

**<u>न्यायनिर्णय</u>**
(<u>दिनांक ०४ जानेवारी, २०१९</u>)

१) आरोपी वर मुंबई प्रतीबंधक कायदा कलम ६५–फ प्रमाणे अपराध केल्याचा आरोप आहे.

२) सरकारतर्फे थोडक्यात प्रकरणाची हकीगत अशी की, दिनांक ०९/०८/२०१७ रोजी १६:०० वाजेच्या दरम्यान पोलीस स्टेशन, पालांदूर, यांना गोपनीय माहिती मिळाली त्यामुळे आरोपीचे राहते घरी मौजा रिंगोळा येथे गेले व घराची झडती घ ेतली असता आरोपीच्या ताब्यातुन ०४ शिश्या प्रत्येकी १८० मि.ली. देशी दारु मिळून आली. सदरील माल पंचासमक्ष जप्त करून अपराध क्र. ६०६३/२०१७ प्रमाणे आरोपी विरूद्ध गुन्हा नोंद केला व दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले.

३) आरोपी विरूद्ध मुंबई प्रतीबंधक कायदा कलम ६५ (फ) प्रमाणे नि.क्र. ८ खाली दोषारोप ठेवून अपराधाचे विवरण विरचीत केले असता त्याने गुन्हा कबूल नसल्याचे कथन केले व प्रकरणाचे संपरिक्षा करावी अशी मागणी केली. आरोपी विरूध्द कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जवाब (नि.क्र.८) नोंदविण्यात आला, आरोपीने नकारात्मक भुमिका घ ेउन त्याच्याविरूद्ध लावलेला गुन्हा खोटा असल्याचे कथन केले.

४) अभियोग पक्षाने मांडलेल्या वस्तुस्थिती, साक्षदारांचे बयान, सरकारी वकीलांनी युक्तिवाद केला नाही व आरोपी करीता श्री.पी. टी. खेडीकर, यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकल्यानंतर, विचारार्थ निघालेले प्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष सविस्तर

कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात आले.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष असे सिध्द करते काय की, आरोपीच्या ताब्यातून ०४ शिश्या प्रत्येकी १८० मि.ली. देशी दारू मिळून आली व मुंबई प्रतिबंध कायदयाचे कलम ६५(फ) नुसार शिक्षापत्र गुन्हा केला? | ...नाही. |
| २) | आदेश काय? | ...आरोपीला दोषमुक्त करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमंसा</u>

५) अभियोग पक्षाने आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता दोन साक्षदार तपासले:— पंच रामा जयराम भोयर (सा.क्र.१) व पोलीस हवलदार अरुण गंथाडे (सा.क्र. २).

६) अभियोग पक्ष सदरील दस्ताऐवजावर अवलंबून राहीले :— इन्व्हॉईस चालान (नि.क्र.११).

७) आरोपीने बचावासाठी कोणताही पुरावा सादर केला नाही.

**<u>प्रश्न क्र.१ साठी</u>** :—

८) आरोपी वरील मुंबई प्रतिबंधक कायदा कलम ६५(फ) अन्वये गुन्हा सिध्द करण्याकरिता आरोपीच्या ताब्यात अवैद्यरित्या दारू मिळून आली होती, ती दारू त्याने विक्री करीता ताब्यात ठेवली होती किंवा तो त्याची विक्री करीत होता, हे सिध्द करणे अभियोग पक्षाची जबाबदारी आहे.

९) पोलिस हवालदार गंथाडे (सा.क्र.२) यांनी त्यांच्या साक्षीत असे सांगितल

की, दिनांक ०९/०८/२०१७ रोजी त्याने सिल बंद केलेला मुद्देमाल क्रमांक २७/२०१७ नोंदवून घेतलं. त्यानंतर दिनांक १९/०८/२०१७ रोजी, न्याय वैज्ञानिक प्रयोग शाळा नागपूर येथे पोलिस कॉन्स्टेबलच्या हस्ते पाठविलं व त्यांनी इन्व्हाईस चालान (नि.क्रं. ११) आणून जमा केलं. यांच्या उलट तपासणीतून काहीही विसंगत आढळून आलं नाही.

१०) रामा (सा.क्र.१) हा पंच असुन त्याने त्याच्या साक्षेत असे सांगितले की, पोलीसांनी त्याच्या समक्ष कोणतीही कारवाई केली नाही आणि पंचनाम्यातील मजकूर त्याला माहित नाही असे सांगू अभियोग पक्षास मदत केली नाही. अभियोग पक्षाने हया साक्षदाराला विचारलेल्या उत्तरसुचक प्रश्ना वरून काहीही आढळून आला नाही, त्यामुळे सदरील साक्षदाराची साक्ष अभियोग पक्षास मदत कुठलीही मदत करीत नाही.

११) अभियोग पक्षाने दुसरा पंच, तपासी अधिकारी किंवा इतर साक्षदार यांना तपासल नाही. ज्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामे सिध्द झाले नाही व आरोपीचे ताब्यातून देशी दारु मिळून आली. अभियोग पक्षाने अभिलेखावर रासायनिक विश्लेषण अहवाल सुध्दा दाखल केला नाही, त्यामुळे हे सिध्द होत नाही की, मुददेमाल क्र. २७/२०१७, ही देशी दारु होती.

१२) तसेच अभियोग पक्षाने पुराव्यात हे पण आणल नाही की, पोलिसांना गोपनीय माहिती कुठून मिळाली व आरोपी नेहमीच दारूची विक्रि करतो याची पुर्ण चौकशी करून घेतली नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यात विनापरवाना दारू बाळगतांना मिळून आली हे अभियोग पक्ष सिध्द करू शकला नाही. म्हणून प्रश्न क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदविले आहे.

<u>**प्रश्न क्र.२ साठी**</u> :—

१३) वरील प्रश्न क्र. १ मध्ये दिलेल्या कारणमिमांसाप्रमाणे अभियोग पक्ष आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्याकामी असमर्थ ठरले आहे. अशा परिस्थितीत आरोपी हा

दोषारोपातून मुक्त होण्यास पात्र ठरला आहे. जप्त मुद्देमाल ०४ शिश्या प्रत्येकी १८० मि.लि. देशी दारू राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे आव्हान कालावधीनंतर योग्य विल्हेवाटी करिता पाठविण्यात यावे. म्हणून प्रश्न क्र. २ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) आरोपीस मुंबई प्रतिबंधक कायदयाचे कलम ६५(फ) याचे दोषारोपातुन फौजदारी प्रकरण संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष सोडण्यात येत आहे.

२) आरोपीने दिलेली बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपीने फौजदारी प्रकरण संहिता कलम ४३७–अ प्रमाणे रूपये ७,५००/– चा जामीन दयावा.

४) जप्त मुद्देमाल ०४ शिश्या प्रत्येकी १८० मि.लि. देशी दारू राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे फौजदारी प्रकरण संहिता कलम ४५२ प्रमाणे योग्य विल्हेवाटी करिता पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित.)

स्वा/–

लाखनी (प्रियंका आर. पमनानी)

दिनांक–०४/०१/२०१९ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, लाखनी